REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# “महिला सबलीकरण आणि महाराष्ट्र शासनाची भूमिका”

प्रा.डॉ शेंडे डी.डी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, रा. ब. ना. बोरावके महाविदयालय, श्रीरामपुर.

**गोषवारा :-**

विकासाची प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महिलांच्या सबलीकरणा एवढा चांगला पर्याय नाही अर्थात महिलांच्या सहभागाशिवाय विकासाची कोणतीही प्रक्रिया पुर्ण होवू शकत नाही अशी आज सामाजिक, राजकीय आर्थिक व सांस्कृतिक स्थिती निर्माण झाली आहे. पांरपारिक भुमिका असो अथवा आधुनिक महिलांसाठी कोणतीही गोष्ट आत असाध्य राहिलेली नाही. महिला आज माता, भगिणी, व सहचरिणी अशा विविध भुमिका निभावून पुरूषांना भक्कम साथा देतांना दिसतात. आधुनिक जगात शिक्षिका, व्यवस्थापक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील एवढेच नव्हे तर संरक्षण क्षेत्रातही महिला कार्य करतांना दिसतात. थोडक्यात पुरूषांची मक्तेदारी असलेल्या सैनिकी, वैज्ञानिक, गिर्याराहेन या क्षेत्रातही महिलांनी प्रवेश करून आपले कतृत्व सिध्द केले आहे.



२० शतकाच्या आगोदर-पुर्वीच्या काळी महिंलाच्या बाबतीत अशी स्थिती नव्हती. महिलांना दुय्यम वागणुक दिली जाई. महिलांचे अस्तित्व केवळ मुलगी, पत्नी, आई एवढया पुरतेच मर्यादित होते. महिलांना स्वतःहाच्या विकासासाठी संधी दिली गेली नाही. तीला नेहमीच पिता, पती, पुत्र यांच्या मर्जीनुसार जीवन जगावे लागत असे. अगदी औदयोगिक क्षेत्रात क्रांती झालेल्या पाश्चात्य देशातही १९ व्या शतकापर्यंत महिलांना दुय्यम स्थान दिले जात होते. अनेक वर्षाच्या संघर्षानंतर सामाजिक, शैक्षणिक, बदलामुळे महिला सक्षम बनू लागल्याचे दिसून येते.

**प्रस्तावना :-**

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामुळे महिलांचे सबलीकरण मोठया प्रमाणात झाले असून शिक्षित महिला असलेल्या ठिकाणी सबलीकरणची प्रक्रिया जास्त वेगाने झालेली दिसून येते. महिलांना मिळालेल्या/घेतलेल्या शिक्षणामुळे महिलांना विवाह, मातृत्व, नोकरी/व्यवसाय या बाबत निर्णय घेण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. समाजामध्ये आजही अविवाहीत महिला, विधवा, घटस्फोटीत यांच्या बाबतीत सहानुभूचे प्रमाण अत्यल्प असून त्यांच्या कडे पाहण्याची समाजाची भूमिका सकारात्मक होणे गरजेचे आहे. परंतु या क्षेत्रातही आता हळू-हळू बदल होत असून त्यांनाही मानाचे स्थान दिले जात आहे.

राजकीय क्षेत्रामध्येही भारतीय महिलांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. उदा. इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, मीरा कुमार, सुमित्रा महाजन, सोनिया गांधी, कु. मायावती, ममता बॅनर्जी, जयललिता, यांच्या सरख्या महिलांनी राजकीय क्षेत्र गाजविले तर सामाजिक क्षेत्रातही अरूधंती भाटट्राचार्य, किरण मुझुमदार, शॅा चंदा कोचर, मेघा पाटकर यांच्या सारख्या महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

आरोग्याच्या क्षेत्रातच महिलांची सर्वाधिक परवड झालेली दिसते. कारण कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना महिलांच्या आरोग्य चे अनेक प्रश्न निर्माण होताना

दिसतात. अर्थात शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात महिलांना या त्रासाला सामोरे जावे लागते. केंद्रशासन तसेच राज्य शासनही या बाबतीत विविध प्रकारचे कायदे करून, अभियान राबवून, योजना आखून, महिलांच्या वैयक्तिक जीवनात सुधारणा कशी करता येईल या दृष्टीने प्रयत्न करत आहे.

### अभ्यासविषयाची उदिष्टये :-

१. महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.
२. महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने राजसरकारने घेतलेल्या निर्णयाचा अभ्यास करणे.
३. त्यामुळे महिलांच्या जीवनात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

### अभ्यासाची पध्दती :-

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्यात अनेक साधु-संतानी विचारवंतानी, समाजसुधारकांनी समाज जागृतीसाठी प्रयत्न केले. महिलांना समाजव्यवस्थेमध्ये समान स्थान कसे मिळेल यासाठी प्रयत्न केले त्यांच प्रमाणे शिक्षणामुळे महिलांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण होवून आपणही विविध क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करू शकतो हे संधी मिळतात सिध्द केले.

भारतीय घटनाकारानी घटनेत आवश्यक त्या ठिकाणी नोंदी/कायदे करून महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क दिले. आज भारतातील व महाराष्ट्रातील महीला सन्मानाने जीवन जगत असून महिलांच्या आर्थिक विकासासाठी, त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. त्यामुळे महिला आज सक्षम बनत असल्याचे दिसून येते. त्या सर्व घडामोडीचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

### महिलांची सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती :-

प्राचीन कालखंडा पासून महिला, सामाजिक आणि कौटुबिंक आन्यायाच्या बळी ठरल्या. पांरपारिक भारतीय समाज व्यवस्थेत तर महिलांना शेकडो वर्ष हक्कांपासून वंचित ठेवले. महिला पुरूषांच्या विकासाच्या प्रक्रीयेतील अडथळा आहे अशा दृष्टीकोणातून त्यांच्याकडे पाहिले जायचे. चुल आणि मुल या व्यतेरिक्त महिलांना कोठेही स्थान नव्हते. समाजातील दुर्बल आणि अन्यायग्रस्त घटक अशी तत्कालीन कालखंडात महिलाची अवस्था झाली होती.

अतिप्राचीन कालखंडात महिलांना समाजव्यवस्थेत समानतेचे/पुरूषांच्या बरोबरीने स्थान होते. पंरतु मनुस्मृतीच्या उदयानंतर महिला कडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. चार्तुवर्ण व्यवस्थेमुळे तर जाती व्यवस्था घटट् बनली. विशिष्ट व्यवसाय विशिष्ट वर्गाची मक्तेदारी बनली. मोगल राजवटीमध्येही महिलांच्या सामाजिक स्थितीत फारसा बदल झाला नाही मराठा राजवटीत महिलांना अधिकार मिळाले नाही पंरतु महिलावरं होणारे अन्याय मात्र मोठया प्रमाणात कमी झाले. पेशव्याच्या राजवटी तर महिलांकडे केवळ भोगवस्तू म्हणून पाहिले गेले. या कालखंडात त्यांच्यावर मोठे अन्याय झाले. या कालखंडात अनेक कुप्रथाचा जन्म झाला. ब्रिटीश राजवटीमध्ये समाजाच्या बौध्दिक कक्षा रूंदावण्यास सुरूवात झाली. समाज सुधारकांनी सतीची चाल बंद करणे, विधवा पुर्नविवाह विवाह यासाठी ब्रिटीशांकडे आग्रह धरला व त्या प्रथा बंद केल्या. महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षण देवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तर भारतीय घटनाकारांनी महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क देवून राज्यघटनेत नोंद केली. स्वातंत्र्यानंतरच खऱ्या अर्थाने भारतातील महींलाच्या सबलीकरणास चालना मिळाली. महिलांना शिक्षणाची द्वारे खुली झाली. आपल्या बुध्दीमत्तेच्या आधारे शिक्षण घेवून महिला सर्वच क्षेत्रात आज पुरूषांच्या बरोबरीने काम करत आहे. याच शिक्षणामुळे भारतातील महिला आज राष्ट्रपती, पंतप्रधान, सभापती, संरक्षणमंत्री, मुख्यमंत्री, पदापर्यंत जावून पोहचल्या आहेत. तर काही महिला बुध्दीमत्तेच्या जोरावर इतर देशांच्या वकिलांतीमध्ये काम करत आहे. काही महिला उदयोग क्षेत्रात व्यवस्थापक म्हणून कार्य करत आहेत तर काही महिला प्रशासकीय क्षेत्रातही कार्य करतांना दिसतात. अर्थात सर्वच क्षेत्रामध्ये पुरूषांच्या तुलनेत महिलांची संख्या खुप कमी असून त्यात वाढ होणे गरजेचे आहे म्हणून नोकरी क्षेत्रातही महिलांसाठी राखीव जागांची आवश्यकता आसल्याचे दिसून येते.

## महिलांच्या सबलिकरणासाठी केंन्द्रशासनाने केलेले प्रयत्न :-

महीलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या दुर करण्यासाठी सयुंक्त राष्ट्रसंघाने १९४६ मध्ये महिला आयोगाची स्थापना केली. तर १९५२ मध्ये सयुंक्त राष्ट्रसंघाच्या आम सभेने महिला पुरूषांच्या बरोबरीने हक्क असावेत याबाबतीत ठराव केला त्यांनंतर १० वर्षानी म्हणजे १९६२ मध्ये महीलांच्या विवाहाचे किमान किमांन वय, विवाहाची नोंदणी या संबधीचे ठराव समंत केले. महिलांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी युनोने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून साजरे केले. व त्यासाठी अमेरिकेतील मेक्सिको शहरात महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. १९८५ मध्ये सयुंक्त राष्ट्रसंघाने महिलांच्या विकासासाठी 'महिला विकास निधी' ची स्थापना केली तर १९८०, १९८५, १९९५ साली अनुक्रमे कोपेनहेग, नैराबी, बिंजिग या शहरामध्ये आंतरराष्ट्रीय महिला परिषदांचे आयोजन करण्यात आले होते, तर सन २००० मध्ये युनोच्या आमसभेने महिलाविषयीचे विशेष अधिवेशन बोलावले होते या अधिवेशनात जगातील १८० देशाच्या महिला प्रतिनिधीनी भाग घेतला होता.

कायदा/घटनात्मक तरतुदी महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा आधारस्तंभ आहे. भारतही त्यास अपवाद नाही भारतीय राज्यघटनेनुसार भारतातील प्रत्येक स्त्री-पुरूष नागरिकास समान अधिकार प्राप्त झाले आहेत. भारत सरकारने महिला सबल होण्याच्या दृष्टीने महत्वाचे कायदे केले आहेत. त्यातील काही कायदे पुढील प्रमाणे.

१. सती बंदी कायदा - १९३९, १९८७
२. वारसा हक्क अधिनियम - १९८०
३. बालविवाह प्रतिबंधक कायदा - १९५४
४. मजुरी दर अधिनियम - १९४८
५. विशेष विवाह कायदा - १९५४
६. नोंदणी विवाह पध्दती कायदा - १९५४
७. हिंदू विवाह पध्दती कायदा - १९५५
८. वेश्या व्यवसाय विरोधी कायदा - १९५६
९. दत्तक घेण्याचा कायदा - १९५६
१०. द्विपत्नी/द्विभार्या प्रतिबंधक कायदा - १९५५
११. घटस्फोट कायदा - १९५५
१२. पोटगी कायदा - १९४६, १९५६
१३. मातृत्व लाभ कायदा - १९६१
१४. हुंडा प्रतिबध अधिनियम - १९६१, १९८४
१५. विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्याचा कायदा - १९७२
१६. बलात्कार विरोधी कायदा - १९८०
१७. कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा - २००५

अशा विविध कायदयाच्या माध्यमातून महिलांना सरंक्षण देवून त्यांना अधिकाअधिक सवलती, फायदे कसे देता येईल यासाठी केंद्रशासन प्रयत्नशिल आहे.

## महिला सबलिकरणाच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाची भूमिका :-

केंद्रशासनाबरोबरच महाराष्ट्र राज्यशासनानेही महिला मध्ये स्वाभिमान जागृत करून त्या अधिकधिक सबल कश्या होतील यासाठी योजना आखलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे.

१. व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विदयावेतन.
२. देवदासी पुनर्वसन योजना.
३. कामधेनू योजना
४. सावित्रीबाई फुले बहुउददेशिय महिला केंद्र
५. मनोधैर्य योजना.

६. तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सशक्तीकरण योजना.
७. मातृत्व अनुदान योजना.
८. इंदिरा आवास योजना.
९. शासकीय महिला वसतीगृहे.
१०. स्वयंसेवी आधारगृहे.
११. संरक्षण गृहे
१२. महिला समुपदेशन केंद्र.
१३. सामुदायिक विवाह योजना.

महाराष्ट्र शासन महिलांच्या संदर्भात वरील योजना प्रभावीपणे राबवत असून ८ मार्च २०१८ रोजी जागतिक महिला दिनांच्या निमित्ताने महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने एका आर्थिक वर्षात जे महत्वाचे निर्णय घेतले ते पुढीलप्रमाणे.

**१. माझी कन्या भाग्यश्री :-**

राज्यामध्ये मुलींचा जन्मदर वाढविणे स्त्री भ्रूण हत्या रोखणे, तसेच तिच्या पोषाणासाठी हि योजना सुरू केली असून ज्या ग्रामपंचायत कक्षेत मुलींचे लिंग गुणोत्तर एक हजारापेक्षा जास्त असेल अशा ग्रामपंचायतीला पाच लाखाचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

**२. बेटी बचाओ बेटी पढाओ :-**

केंद्रशासनाच्या बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानासाठी महाराष्ट्रातील औरंगाबाद, अहमदनगर, बीड, जालना, जळगाव, उस्मानाबाद, बुलढाणा, वाशि व कोल्हापूर व सांगली या १० जिल्हयाचा समावेश करण्यात आला असून या योजने अंतर्गत मुलींच्या शिक्षणासाठी व जन्मदर वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

**३. अंगणवाडी कर्मचाऱ्याच्या मानधानात वाढ :-**

महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका व मदतनिसांच्या मानधनात वाढ करण्यात आली. असून त्यामध्ये अंगणवाडी सेविकांना रू ६५०/- मदतनीसांना रू ५००/- तर मिनी अंगणवाडी सेविकांना रू ५५०/- रू प्रति महिना मानधनात वाढ करण्यात आली.

**४. सी.एस.आर मधुन महिलांचा कौशल्य विकास :-**

महिलांना व्यावसायिक वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी आय केअर संस्थेबरोबर सामजस्य करार करण्यात आला.

**५. हिरकणी कक्ष :-**

मोठ-मोठया शासकीय कार्यालयामध्ये महिला कर्मचाऱ्याना त्यांच्या बाळांना स्तनपान करणे सुलभ व्हावे यासाठी हिरकणी कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी प्रथम मंत्रालय व एस.टी बसस्थानके या ठिकाणी या सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

**महिलांसाठी हेल्पलाईन :-**

अडचणीत सापडलेल्या महिलांसाठी १८१ या टोल फ्री क्रंमाकावर हेल्पलाईन सुरू करण्यात आली.

### ६. बचत गट चळवळीला गती :-

राज्यात महिला बचत गटांची संख्या मोठी असून बचत गट चळवळीला गती देण्यासाठी महिला स्वावलंबी होण्यासाठी, त्यांच्या व्यवसायांना शुन्य टक्के व्याजदराने कर्ज देण्याची प्रक्रिया राज्यशासनाने सुरू केली आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्र राज्य शासनाने विविध योजनाच्या माध्यमातून महिला अधिकधिक सक्षम होण्यासाठी योजना राबविलेल्या आहेत.

### संदर्भ :-

१. योजना - (विकास समर्पित मासिक) संप्टेबर २०१६.
२. मानवी हक्क - तुकाराम जाधव.
३. महिलांच्या मानवाधिकाराचे उल्लघंन - आशा खांडेकर.
४. नागरिकांचे मुलभुत अधिकार - देगावकर राजेश. दै. सार्वमत दि. ८ मार्च